महाराष्ट्र शासन
नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
तळमजला, मध्यवर्ती कार्यालये, पुणे ४११००१

दूरध्वनी क्र.०२०-२६१२२०७६

Email: ddtpho_pune@rediffmail.com
ddtp.ho@maharashtra.gov.in

## -: प्रसिध्दीपत्रक :-

नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभागाच्या आस्थापनेवरील उच्चश्रेणी लघुलेखक व निम्नश्रेणी लघुलेखक (गट-ब / अराजपत्रित) संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाने भरणेबाबतची प्रक्रिया संचालनालयाच्या स्तरावर सुरु आहे. उच्चश्रेणी लघुलेखक व निम्नश्रेणी लघुलेखक (गट-ब / अराजपत्रित) या पदांच्या सदरहू ऑनलाईन परीक्षेच्या प्राप्त निकालानुषंगाने व्यावसायिक चाचणी परिक्षेसाठी पात्र झालेल्या उमेदवारांची व्यावसायिक कौशल्य चाचणी परीक्षा एकाच दिवशी, एकाच परीक्षा केंद्रावर रविवार दि.१७.०८.२०२५ रोजी **एम.आय.टी. आर्ट, डिझाइन आणि टेक्नोलॉजी विद्यापीठ (MIT ADT School of Computing Building), राजबाग लोणी काळभोर, पुणे – ४१२२०१** या परीक्षा केंद्रावर आयोजित करण्यात आलेली आहे.

०२. सदरहू व्यावसायिक चाचणी परीक्षेच्या अनुषंगाने, उमेदवारांना प्रवेश पत्राद्वारे नमूद बॅच निहाय परीक्षेची वेळ कळविण्यात आलेली आहे. तरी, उमेदवारांनी परीक्षेच्या प्रवेश पत्रावरील नियोजित वेळेच्या ०१ तास अगोदर परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे अनिवार्य आहे. उमेदवारांना परीक्षा केंद्रावर नियोजित स्थळी पोहाचण्याकरिता परीक्षा केंद्राचे लोकेशन https://maps.app.goo.gl/KpEuq2MDmZ8FMu328?g_st=iw या Link द्वारे देण्यात येत आहे. सदरहू पदाची व्यावसायिक चाचणी परीक्षा ही नियोजित केंद्रावर South Wing मधील ०५ व्या, ०६ व्या व ०८ व्या मजल्यावर होणार असून, वर्ग निहाय बैठक संख्या व बैठक व्यवस्थेच्या तपशिल सोबत प्रसिध्द करण्यात येत आहे. बैठक व्यवस्थेबाबतची माहिती परिक्षा केंद्राच्या सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात येणार आहे. उमेदवारांनी परीक्षेस येताना परीक्षेचे प्रवेश पत्र (Hall Ticket) Download करुन त्याची प्रत व उमेदवारांना दिलेल्या सर्वसाधारण सूचना व प्रवेश पत्रावर नमूद सूचनांप्रमाणेचेच केवळ साहित्य व पारपत्र आकाराचे (Passport) छायाचित्र (Photo) सोबत घेऊन येणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे, सदरहू परीक्षेस येताना कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रानिक वस्तु व अन्य तद्नुषंगिक साहित्य सोबत आणू नये. याबाबत उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी.

१७/०८/२०२५

( विजयकुमार ल. वाघमोडे )
सदस्य सचिव,
राज्यस्तरीय निवड समिती, पुणे.
तथा,
उपसंचालक, नगर रचना,
मुख्य कार्यालय, पुणे.

( जितेंद्र ल.भोपळे )
अध्यक्ष,
राज्यस्तरीय निवड समिती, पुणे.
तथा
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

E:\Admin-1\सरळसेवा_2024-25\Planning Assistant\Genral\Noting 24-25_F.docx